निलंबन कालावधीचा निर्णय घेणेबाबत.
श्रीम. मंजिरी मदन नगरकर, सेवा निवृत्त कनिष्ठ
सहाय्यक, पंचायत समिती अहिल्यानगर

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/अस्था-३/२८२०७३९/६७८/२०२६
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्रं.आस्था-३/१११/२००७ दिनांक २७/०२/२००७
२. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील आदेश जा.क्र.मविसे २५०९/प्र.क्र.८२ आस्था-२ दिनांक १४ जुलै २०१७
३. इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि/आस्था-३/२८२०७३९/ १२४२/२०२५ दिनांक २७/१२/२०२५
४. श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक यांचा खुलासा दिनांक २०/०१/२०२६
५. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढुन टाकणे ह्या काळातील प्रदाने) नियम १९८१ नियम ७२ (७)(५)

श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) ह्या पंचायत समिती नगर येथे कार्यरत असताना पाणी टंचाईचे कामकाजामध्ये अक्षम्य दुर्लक्ष करुन कामकाजात हलगर्जिपणा केलेमुळे श्रीम नगरकर यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने श्रीम नगरकर यांना या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये सेवेतुन सेवा निलंबित करणेत आलेले होते.

सदर प्रकरणी शासनाकडुन संयुक्त चौकशी करणेत येऊन संदर्भ क्रमांक २ अन्वये अंतिम आदेश पारित करणेत आलेला आहे. सदर आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ नुसार श्रीम नगरकर यांच्या निवृत्तीवेतनातुन दरमहा ६ टक्के इतकी रक्कम एक वर्षाकरीता कपात करणेत यावी तसेच शासन नुकसानीची रक्कम रु ६९,५१६/- पैकी १/३ इतकी म्हणजे रु २३,१७२/- रक्कम सेवा उपदानातुन एकरकमी वसुल करण्यात यावी अशी शिक्षा अंतिम करणेत आलेली आहे. श्रीम नगरकर ह्या दिनांक ३०/०४/२०१७ रोजी नियत वयोमानानुसार सेवेतुन सेवा निवृत्त झालेल्या आहेत.

तरी श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक यांचा दिनांक २८/०२/२००७ ते दिनांक ३०/०४/२०१७ अखेर १० वर्षे २ महिने २ दिवस सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेणेची बाब विचाराधीन होती.

या कार्यालयाकडील संदर्भ क्रमांक ३ नुसार श्रीम. नगरकर, यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावुन खुलासा मागविणेत आला होता. श्रीम नगरकर यांचा संदर्भ क्रमांक ४ नुसार खुलासा सादर केला. श्रीम. नगरकर यांनी निलंबन कालावधी हा सेवा निलंबन कालावधी म्हणुन धरल्यास त्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. त्यांना नियमित सेवा निवृत्ती वेतन मिळणार नाही. तरी

त्यांच्या खुलाशाचा सहानभुतीपुर्वक विचार करुन त्यांचा खुलासा मान्य करणेत यावा. व त्यांचा दिनांक २८/०२/२००७ ते दिनांक ३०/०४/२०१७ अखेर १० वर्षे २ महिने २ दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवेच्या सर्व कारणांसाठी सेवा कालावधी म्हणुन नियमित करणे बाबत विनंती केलेली आहे.

सबब श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती अहिल्यानगर यांनी सादर केलेला खुलासा अंशत: मान्य करणेत येऊन संदर्भ क्र. ५ मध्ये नमूद केलेल्या नियमातील तरतूदीनुसार निम्न स्वाक्षरीत नियुक्ती प्राधिकरणास प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर, श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती अहिल्यानगर, यांचा दिनांक २८/०२/२००७ ते दिनांक ३०/०४/२०१७ अखेर १० वर्षे २ महिने २ दिवस सेवा निलंबन कालावधी हा सेवा निवृत्ती विषयक लाभाकरीता सेवा काळ धरणेत येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती अहिल्यानगर, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 20260714040128 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 14-07-2026 12:11:12

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम नगरकर मंजिरी मदन, सेवा निवृत्त कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती अहिल्यानगर

द्वारा :- गट विकास अधिकारी,पंचायत समिती अहिल्यानगर

२/- सदर आदेश संबंधितास बजावुन बजावलेबाबतची तारखेसह स्वाक्षरीची पोहोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- निवडनस्ती.

स्वाक्षरीत /--

(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर